# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज थोडयावेळयापूर्वी दूरदृष्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उत्तर प्रदेशातील वाराणसीमध्ये आयोजित ७२व्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेचं उद्घाटन केलं. आपण सर्वजण एक भारत श्रेष्ठ भारत अभियानाचं सुंदर चित्र सादर करत आहात या शब्द्वात पंतप्रधानांनी सहभागी खेळाडूंना प्रोत्साहीत केलं.आपल्या सरकारच्या मागिल दहा वर्षात सर्व क्षेत्रात गतीमान सुधारणांच्या माध्यमातून बदल केले. खेळाकडे बघण्याची उदासीनता बदलून खेळात अमुलाग्र बदल करत देशाची क्रीडा रचना खेळाडू केंद्रित बनवल्याचं त्यांनी सांगितलं. शालेय स्तरावर ऑलम्पिक दर्जाचं वातावरण उपलब्ध होत असल्याचं ते म्हणाले.राज्यं आणि संस्थांचं प्रतिनिधित्व करणा-या ५८ संघांमधील एक हजारांहून अधिक खेळाडू या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होत आहेत.

***

विकसित भारत- जी राम जी योजना कष्टक-यांच्या फायद्याचीच असून याद्द्वारे वाढीव मानधन,बेरोजगार भत्ता,मानधन विलंबासाठी व्याज,शंभर ऐवजी सव्वाशे दिवस रोजगाराची हमी देण्यात आली आहे अशी माहिती केंद्रीय ग्रामिण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली आहे. विकसित भारत- जी राम जी योजनेद्वारे कष्टक-याची आर्थिक स्थिती  सुधारण्यासह ते ग्रामविकासात सार्थकपणे योगदान देतील असं ते यावेळी म्हणाले. पूर्वीची मनरेगा योजना भ्रष्टाचाराचं एक मध्यम बनली होती,ज्याद्वारे कष्टक-यांकडे दूर्लक्ष करत त्यांचच शोषण केलं जात होतं असं  चौहान म्हणाले. मोठ्या प्रमाणात अनुदान दिलेलं असूनही मनरेगातून कोणतीही स्थायी संपत्ती अथवा खेड्यांचा दिर्घकालीन विकासही झालेला नसल्याचं त्यांनी नमूद केलं. काँग्रेस पक्ष नव्या योजनेबद्दल

दिशाभूल करुन मनरेगातील भ्रष्टाचारालाच संरक्षण देत असल्याचा आरोप चौहान यांनी यावेळी केला.

****

सातारा इथं आयोजित तीन दिवसीय,९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज दुपारी साडेचार वाजता समारोप होत आहे. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त गुजराती भाषेतील ज्येष्ठ साहित्यिक रघुवीर चौधरी,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांसह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित असणार आहेत. आज दिवसभरात संमेलनात,पुस्तक चर्चा,मुलाखत,कविसंमेलन,परिसंवाद आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे .

****

भारताच्या प्रगतीनं सरलेल्या२०२५मध्ये जगाचं लक्ष वेधून घेतलं. जगात अनिश्चिततेचं वातावरण असताना भारत मात्र आपल्या ध्येयाकडे ठामपणे आणि सातत्यपूर्ण वाटचाल करत राहिला.

गेल्या दशकभरात १७ कोटींहून अधिक नागरिकांना आत्यंतिक दारिद्र्यातून बाहेर काढण्यात यश आल्याबद्दल जागतिक बँकेने भारताचं कौतुक केलं आहे. महाराष्ट्र, बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यातल्या आत्यंतिक दारिद्र्यात दोन तृतीयांश घट झाल्याचं जागतिक बँकेच्या अहवालात म्हटलं आहे. गेल्या दहा वर्षांत भारताच्या ग्रामीण भागातल्या आत्यंतिक दारिद्र्याचं प्रमाण अठरा टक्क्यावरून दोन पूर्णांक आठ दशांश टक्क्यापर्यंत घसरल्याचं यात म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्ट निर्देशांकात भारतानं पहिल्यांदाच पहिल्या शंभर देशात प्रवेश केला आहे. स्वच्छता, आरोग्य, आर्थिक समावेशन आणि डिजिटल प्रशासन या क्षेत्रातल्या प्रगतीमुळे देशाला हे ध्येय साधता आलं. गेल्या दशकभरात भारतीय नागरिकांच्या जीवनात आर्थिक सुबत्ता आली आहे. जनधन योजनेमुळे सध्या देशातल्या ८९ टक्के प्रौढ नागरिकांकडे बँक खाती आहेत. या योजनेने नागरिकांसाठी आर्थिक सुबत्तेचं दार उघडून दिल्याचं जागतिक बँकेच्या अहवालात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीसाठी ईव्हीएम –इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध तहसील कार्यालयांकडून ते हस्तगत करण्यात आले.

यानुसार,एकूण मतदान केंद्रांच्या संख्येच्या किमान दहा टक्क्यांपेक्षा जास्त अर्थात बाराशे सदुसष्ट  मतदान केंद्रांसाठी एकूण तेराशे सत्त्यानऊ नियंत्रण एकक याशिवाय, प्रत्येक निवडणूक निर्णय अधिका-यांना वीस टक्के अतिरिक्त मतमोजणी घटक याप्रमाणे यंत्रणा उपलब्ध झालेली आहे. सर्व यंत्रांच्या तपासणी-साठवण-वितरणाचं नियोजन नियमानुसार होत आहे

****

६८व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय लष्कराच्या अजय कुमार यानं पुरुषांच्या दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकलं आहे.रेल्वेच्या शुभम बिस्ला यानं रौप्य, तर हरियाणाच्या अनमोल जैननं कांस्यपदक जिंकलं. तर,कर्नाटकच्या जोनाथन गॅविन अँटनी यानं  उत्कृष्ट कामगिरी करत उप-युवा, युवा आणि कनिष्ठ गटांमध्ये सुवर्णपदके जिंकली.

****

वेनेझुएला देशाच्या सध्याच्या राजकीय-सामाजिक घडामोडींमुळं  भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं आपल्या नागरिकांसाठी महत्त्वाची सूचना जारी केली आहे. भारतीयांनी अत्यंत आवश्यक कामाशिवाय त्या देशाचा प्रवास टाळावा, जे भारतीय सध्या वेनेझुएलात आहेत, त्यांनी कमालीची सतर्कता बाळगत,आपल्या हालचालींवर मर्यादा ठेवून सुरक्षित ठिकाणी राहण्याच्या सूचना या अंतर्गत देण्यात आल्या आहेत.

****